# होमा कृषी कशी कार्य करते ?

श्री वसंत परांजपे

धातू, अधातू आणि नाना प्रकारच्या वायुरूप विषाक्त पदार्थामुळे जमीन, पाणी, वातावरण व भूमिगत जल प्रदूषित झाले आहे.

वन क्षेत्रातील जमीन मोठ्या प्रमाणावर मृतवत् झाली आहे.

होमा थेरेपीने अशा जमीनीला पुनरूज्जीवित करायला हवे.

अशा पुनरूज्जीवित जमीनीत तऱ्हतऱ्हेचे सूक्ष्म जीवजन्तु, जीवाणू, बुरशी, शेवाळे इत्यादि झपाट्याने वाढतात.

अशा पर्यावरणात वाढणाऱ्या वनस्पती तुलनात्मक दृष्ट्या कमी विषाक्त असतात.

सूक्ष्म जीव जीवाणूंच्या निर्मितीमुळे आता जमीन सचेत झाली आहे व जीवनधारणेसाठी लागणारे सर्व रासायनिक घटक – कार्बन, हाइड्रोजन व ऑक्सीजन या स्वरूपातून या जमीनीला प्राप्त झाले आहेत. आधुनिक विज्ञानानुसार हे तीन रासायनिक घटक एकत्र येऊन जीवाणुंच्या स्वरूपात कार्यरत होतात. उदा. नाइट्रोजन स्थिरावणारा बॅक्टीरिया तसेच जमिनीतील फॉस्फरसवर प्रक्रिया करणारा बॅक्टिरिया.

अशा प्रकारे सूक्ष्म पर्यावरण तयार झाल्यामुळे गांडूळ व तत्सम जीवजन्तूंच्या संख्येत वेगाने वाढ होते. ते शेतातील माती खातात व ती पचवून उत्सर्जित करतात. ही क्रिया अविरत चालू असते.

शेतजमीनीत अग्निहोत्र भस्म टाकले असता जमीनीतील फॉस्फरस विरघळवण्याच्या जमीनीच्या क्षमतेत वाढ होते. केशाकर्षणामुळे वनस्पतीच्या मुळांद्वारा पोषणद्रव्ये शोषली जातात.

नाइट्रोजन, फॉस्फरस व पोटॅश या पोषणद्रव्यांच्या शोषणाची क्रिया वनस्पतींच्या सूक्ष्म पेशींच्याद्वारे प्रभावीपणे केली जाते.

अशा प्रकारे होम हवनाने केलेली कृषी कशी कार्य करते हे आता लोकांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

होमहवन, अग्निहोत्र व इतर यज्ञ शेतात केले असता एक प्रकारचे चैतन्यमय, सकारात्मक वातावरण तयार होते जे वनस्पतींच्या वाढीस अत्यंत अनुकूल ठरते. या वातावरणामुळे पोषणद्रव्ये, उपयुक्त कीटक, सूक्ष्मजीव, जीवाणू, गांडुळासाखे जीव आकर्षित होतात. त्यांना हे वातावरण आल्हाददायक वाटते. ते आनंदित होतात व झपाट्याने वाढू लागतात.

निसर्ग हा एक किमयागार आहे त्यामुळेच हे सर्व शक्य होते. याचा लाभ जमीनीस होऊन वनस्पती सुखावतात व जोमदारपणे वाढतात.

वनस्पतीभोवती अग्निहोत्र भस्म टाकल्याने किंवा अग्निहोत्र भस्माच्या पाण्याचा फवारा दिल्याने त्या विशिष्ट वनस्पतीला पोषक असणारे घटक आकर्षित होतात व वनस्पती जोमाने वाढते.

अर्थातच शेतीतील आंतरमशागतीची कामे उदा. खुरपणी, सेंद्रिय कम्पोस्ट घालणे, अग्निहोत्र भस्माचा वापर, अग्निहोत्र भस्मजलाचे फवारणे, बायोसोलचे फवारणे इ. क्रिया करणे आपल्याला आवश्यक आहे.

तथापि होमहवनाचे आचरण हीच यशाची गुरूकिल्ली आहे.